मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: 9834138482



# नम्रता लोंढे यांना प्रतिष्ठेचा 'समाजभूषण पुरस्कार' प्रदान!

## सामाजिक कार्याची दखल घेत गौरव; गुणवंत विद्यार्थ्यांचाही उत्साहात गुणगौरव सोहळा

» पिंपरी | प्रतिनिधी

**सामाजिक कार्यात सातत्याने सक्रिय असणाऱ्या नम्रता लोंढे यांना संत शिरोमणी श्री. सावंता महाराज प्रतिष्ठान, काळेवाडी यांच्या वतीने यावर्षीचा मानाचा 'समाजभूषण पुरस्कार' देऊन नुकतेच सन्मानित करण्यात आले. प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित एका विशेष सोहळ्यात मान्यवरांच्या उपस्थितीत लोंढे यांच्या समाजोपयोगी कार्याची दखल घेत हा गौरव करण्यात आला.**



याच कार्यक्रमात परिसरातील इयत्ता पहिली ते बारावीपर्यंतच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळाही उत्साहपूर्ण आणि आनंदी वातावरणात पार पडला. शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा यावेळी मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. या प्रसंगी नम्रता लोंढे यांनी उपस्थित गुणवंत विद्यार्थ्यांचे मनापासून कौतुक केले. विद्यार्थ्यांनी आपल्या शैक्षणिक प्रगतीची हीच वाटचाल भविष्यातही कायम ठेवत उच्च शिक्षणाच्या माध्यमातून आपल्या कुटुंबाचे, समाजाचे आणि परिसराचे नाव उज्ज्वल करावे, अशा शुभेच्छा त्यांनी दिल्या.

विद्यार्थ्यांच्या यशामध्ये पालक आणि शिक्षकांचेही मोठे योगदान असते, असे नमूद करत त्यांनी विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक प्रवासासाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांचे मनोबल वाढवणे, त्यांच्या गुणवत्तेला प्रोत्साहन देणे आणि त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करणे या उद्देशाने संत शिरोमणी श्री. सावंता महाराज प्रतिष्ठानच्या वतीने राबविण्यात येत असलेला हा उपक्रम अत्यंत कौतुकास्पद व प्रेरणादायी असल्याचे नम्रता लोंढे यांनी आवर्जून नमूद केले.

सत्काराला उत्तर देताना नम्रता लोंढे यांनी संत शिरोमणी श्री. सावंता महाराज प्रतिष्ठानचे मनःपूर्वक आभार मानले. मिळालेला 'समाजभूषण पुरस्कार' हा केवळ सन्मान नसून, आपल्यावरील सामाजिक कार्याची जबाबदारी अधिक वाढविणारा आहे, अशी भावना त्यांनी व्यक्त केली. या पुरस्कारामुळे सर्वसामान्य नागरिकांच्या हितासाठी, शिक्षणाच्या प्रसारासाठी तसेच समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी भविष्यात आणखी जोमाने आणि सातत्याने कार्य करण्याची नवी ऊर्जा मिळणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या पुरस्कारातून मिळालेली प्रेरणा सामाजिक बांधिलकी अधिक दृढ करण्यास निश्चितच उपयुक्त ठरेल, असेही त्यांनी सांगितले. या प्रेरणादायी सोहळ्यास परिसरातील नागरिक, गुणवंत विद्यार्थी, पालक, शिक्षक तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

### गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

इयत्ता पहिली ते बारावीपर्यंतच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा यावेळी विशेष सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांचे कौतुक करत नम्रता लोंढे यांनी त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांचे मनोबल वाढविण्यासाठी प्रतिष्ठानकडून राबविण्यात येणारा हा उपक्रम प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले.

# माजी मुख्यमंत्री सुधाकरराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त महापालिकेच्या वतीने अभिवादन!

» पिंपरी | प्रतिनिधी

**महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा जलक्रांतीचे जनक सुधाकरराव नाईक यांची जयंती पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने जलसंवर्धनाची शपथ घेऊन साजरी करण्यात आली.**



पिंपरी येथील पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा जलक्रांतीचे जनक सुधाकरराव नाईक यांच्या प्रतिमेस महापौर रवि लांडगे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यांच्या कार्याला उजाळा देत त्यांचे महाराष्ट्राच्या विकासातील योगदान आणि विशेषतः जलसंधारणाच्या क्षेत्रातील दूरदृष्टीपूर्ण कार्याचे यावेळी स्मरण करण्यात आले.

या प्रसंगी उपमहापौर शर्मिला बाबर, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक तसेच महानगरपालिकेचे विविध विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी सुधाकरराव नाईक यांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या विचारांमधून प्रेरणा घेऊन जलसंवर्धनासाठी सातत्याने प्रयत्न करण्याचा निर्धार व्यक्त केला.

माजी मुख्यमंत्री सुधाकरराव नाईक यांनी महाराष्ट्रातील जलसंधारण, पाणी व्यवस्थापन आणि जलसंवर्धनाच्या चळवळीला महत्त्वपूर्ण दिशा देण्याचे काम केले. पाण्याचे योग्य नियोजन, उपलब्ध जलस्रोतांचे संवर्धन आणि भविष्यातील पाणीटंचाईचा विचार करून उपाययोजना करण्यावर त्यांनी भर दिला. त्यांच्या दूरदृष्टीपूर्ण कार्याचे स्मरण करत महापौर रवि लांडगे यांच्या उपस्थितीत यावेळी जलसंवर्धनाची सामूहिक प्रतिज्ञा घेण्यात आली.

पाणलोट विकास, मृद व जलसंधारण, पावसाच्या पाण्याचे संकलन, जलस्रोतांचे पुनरुज्जीवन तसेच भूजल पुनर्भरणाच्या विविध उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेण्याचा संकल्प उपस्थितांनी केला. पाण्याचा काटकसरीने आणि योग्य पद्धतीने वापर करण्याबरोबरच भविष्यातील पिढ्यांसाठी पाण्याचे स्रोत सुरक्षित ठेवण्याची जबाबदारी प्रत्येकाने स्वीकारावी, असा संदेश यावेळी देण्यात आला.

तसेच "माती वाचवा, पाणी जपा, सुरक्षित भविष्य घडवा" हा संदेश जनमानसात व्यापक स्वरूपात पोहोचविण्याचा निर्धार करण्यात आला. जलसमृद्ध, दुष्काळमुक्त आणि शाश्वत महाराष्ट्र घडविण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या जलसंवर्धनाशी संबंधित विविध उपक्रमांना सहकार्य करण्याची सामूहिक शपथही उपस्थितांनी महापौर लांडगे यांच्या उपस्थितीत घेतली.

महापालिकेच्या विविध विभागांनी जलसंवर्धनाच्या उपक्रमांना अधिक व्यापक स्वरूप देत त्यामध्ये नागरिकांचा सक्रिय सहभाग वाढवावा. शहरातील नागरिकांमध्ये पाण्याचा काटकसरीने वापर, पावसाच्या पाण्याचे संकलन, भूजल पुनर्भरण आणि जलस्रोतांचे जतन याबाबत सातत्याने जनजागृती करावी, अशा सूचना महापौर रवि लांडगे यांनी यावेळी दिल्या.

### जलसंवर्धनाची सामूहिक शपथ!

'पाणी ही निसर्गाची अमूल्य संपत्ती असून, त्याचा प्रत्येक थेंब जपणे, पाण्याचा अपव्यय टाळणे आणि उपलब्ध जलस्रोतांचे संवर्धन करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे,' असा संकल्प उपस्थितांनी केला. "पाणी अडवा, पाणी जिरवा" या विचाराला केवळ घोषणेपुरते मर्यादित न ठेवता त्याला प्रत्यक्ष कृतीची जोड देण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला.

# गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर ‘पिंपरी-चिंचवड महोत्सव 2026’ चे आयोजन!

## नाट्य, संगीत, साहित्य, लोककला, मर्दानी खेळांसह विविध सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी!

**» पिंपरी | प्रतिनिधी**

**पिंपरी-चिंचवड शहरातील सांस्कृतिक चळवळीला अधिक व्यापक स्वरूप देणे, स्थानिक कलाकारांना दर्जेदार व्यासपीठ उपलब्ध करून देणे तसेच शहराच्या कला, साहित्य आणि सांस्कृतिक परंपरेचे संवर्धन करण्याच्या उद्देशाने गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर ‘पिंपरी-चिंचवड महोत्सव २०२६’ चे आयोजन करण्यात आले आहे. चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात दि. १८ ते २० सप्टेंबर २०२६ या कालावधीत तीन दिवसीय महोत्सव संपन्न होणार असल्याची माहिती महापौर रवि लांडगे यांनी दिली.**



महोत्सवाच्या आयोजनाबाबत आयोजित पत्रकार परिषदेत महापौर रवी लांडगे, उपमहापौर शर्मिला बाबर, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर यांनी महोत्सवाच्या स्वरूपाची व नियोजित कार्यक्रमांची माहिती दिली.

पिंपरी-चिंचवड शहराने औद्योगिक आणि शैक्षणिक क्षेत्रासोबतच कला, साहित्य, नाट्य, संगीत, क्रीडा आणि लोकसंस्कृतीच्या क्षेत्रातही स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. शहरातील या सांस्कृतिक ऊर्जेला एकत्रित व्यासपीठ उपलब्ध करून देण्याबरोबरच नवोदित कलाकारांना प्रोत्साहन देणे, विविध पिढ्यांना सांस्कृतिक उपक्रमांशी जोडणे आणि गणेशोत्सवाच्या माध्यमातून सामाजिक एकोपा अधिक दृढ करणे हा महोत्सवाच्या आयोजनामागील प्रमुख उद्देश आहे.

तीन दिवसीय महोत्सवात सर्व वयोगटांतील नागरिकांचा सहभाग राहील, अशा पद्धतीने विविध कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले आहे. नाट्यरसिकांसाठी दर्जेदार व लोकप्रिय व्यावसायिक मराठी नाटकांचे विशेष प्रयोग सादर करण्यात येणार आहेत. त्याचबरोबर महाराष्ट्रातील नामवंत गायक-कलाकारांच्या सहभागातून भावगीत, नाट्यगीत, भक्तिगीत तसेच लोकप्रिय मराठी-हिंदी गीतांचा समावेश असलेली संगीत मैफल आयोजित करण्यात येणार आहे.

महाराष्ट्राच्या समृद्ध लोककला आणि लोकपरंपरेचे दर्शन घडविणाऱ्या पारंपरिक लावणीचे सादरीकरण, तरुणाईसाठी आधुनिक संगीत आणि फ्यूजनचा समावेश असलेला रॉक बँड परफॉर्मन्स तसेच विविध सामाजिक विषय, हास्य-विनोद आणि समकालीन आशय मांडणाऱ्या नामवंत कवींचे राज्यस्तरीय कवी संमेलन हे महोत्सवाचे विशेष आकर्षण ठरणार आहे.

महिलांच्या कलागुणांना आणि सर्जनशीलतेला प्रोत्साहन देण्यासाठी पाककला स्पर्धा आणि फॅशन शो आयोजित करण्यात येणार आहेत. महाराष्ट्राच्या शौर्यपरंपरेचे दर्शन घडविणाऱ्या लाठी-काठी, दांडपट्टा व अन्य करण्यात येणार आहे. तसेच पारंपरिक वस्तू, हस्तकला, स्थानिक कलाकुसर आणि खाद्यसंस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी ‘संस्कृती जत्रा’ व प्रदर्शनाचे आयोजनही महोत्सवाच्या निमित्ताने करण्यात येणार आहे.

गणेशोत्सवाच्या आनंदात भर घालणाऱ्या या तीन दिवसीय सांस्कृतिक महोत्सवात शहरातील नागरिक, कलाप्रेमी, महिला, युवक-युवती तसेच विद्यार्थ्यांनी

महोत्सवाचा तपशील
कालावधी : दि. १८ ते २० सप्टेंबर २०२६
स्थळ : प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह, चिंचवड
आयोजक पिंपरी-चिंचवड महोत्सव समिती.

स्पर्धा नावनोंदणी व अधिक माहितीसाठी संपर्क श्री. मनोज डाळीम्बकर — ८२३७३३२२११ श्री. राजेंद्र बंग — ९८२२३१३०६६.

### “पिंपरी-चिंचवडची सांस्कृतिक नगरी म्हणून ओळख दृढ व्हावी”

पिंपरी-चिंचवड शहर हे देशातील महत्त्वाचे औद्योगिक केंद्र म्हणून ओळखले जाते. मात्र या शहराला कला, साहित्य, नाट्य, संगीत आणि लोकसंस्कृतीचीही समृद्ध परंपरा लाभली आहे. शहरातील कलाकारांना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देऊन ही सांस्कृतिक ओळख अधिक दृढ करण्याच्या दृष्टीने पिंपरी-चिंचवड महोत्सव महत्त्वपूर्ण ठरेल. हा महोत्सव केवळ मनोरंजनापुरता मर्यादित न राहता विविध पिढ्या, कलाकार आणि नागरिकांना एकत्र आणणारे सांस्कृतिक व्यासपीठ ठरेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

### शहरातील गुणवंतांचा ‘रत्न’ पुरस्कारांनी गौरव

इयत्ता पहिली ते बारावीपर्यंतच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा यावेळी विशेष सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांचे कौतुक करत नम्रता लोंढे यांनी त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांचे मनोबल वाढविण्यासाठी प्रतिष्ठानकडून राबविण्यात येणारा हा उपक्रम प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले.

# गणरायाच्या आगमनाची उत्सुकता; पिंपरी-चिंचवडमध्ये ढोल-ताशांचा गजर

**» पिंपरी | प्रतिनिधी**

**गणेशोत्सवाचे वेध लागताच पिंपरी-चिंचवड शहरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. लाडक्या गणरायाच्या स्वागतासाठी अवघे काही दिवस उरले असून, गणेश मंडळांसह नागरिकांमध्येही उत्सुकता वाढली आहे. गणरायाच्या आगमनाची जय्यत तयारी सुरू असतानाच शहरातील ढोल-ताशा पथकांचा सराव अंतिम टप्प्यात पोहोचला असून, सायंकाळच्या वेळी शहरातील विविध भाग ढोल-ताशांच्या गजराने दुमदुमत आहेत.**

शहरातील विविध मैदाने, उड्डाणपुलांखालील जागा तसेच नदीपात्र परिसरात सायंकाळच्या वेळी ढोल-ताशांचा कडकडाट ऐकायला मिळत आहे. यंदाचा गणेशोत्सव अधिक भव्य आणि उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यासाठी विविध ढोल-ताशा पथकांनी कंबर कसली आहे. निगडी, आकुर्डी, चिंचवड, पिंपरी, भोसरी आणि सांगवी परिसरात सध्या गणेशोत्सवाची लगबग पाहायला मिळत आहे.

गेल्या दोन महिन्यांपासून अनेक पथकांचा दररोज सायंकाळी ६ ते रात्री ९ वाजेपर्यंत नियमित सराव सुरू आहे. गणेशोत्सवातील मिरवणुकीत तालबद्ध आणि शिस्तबद्ध वादन सादर करण्यासाठी वादकांकडून विशेष मेहनत घेतली जात आहे. या सरावामध्ये केवळ तरुण-तरुणीच नव्हे, तर लहान मुले, महिला तसेच आयटी आणि औद्योगिक क्षेत्रातील नोकरदार वर्गही मोठ्या संख्येने सहभागी होत आहे.

गणेशोत्सवाच्या मिरवणुकीत आपली सर्वोत्तम कला सादर करण्यासाठी ढोल-ताशा पथकांतील वादक सज्ज झाले आहेत. विविध पारंपरिक तालांसह ‘मोरया’, ‘नाद’, ‘पुणेरी’, ‘शिवगर्जना’ यांसारख्या तालांचा आणि नव्या आवर्तनांचा सराव केला जात आहे. ढोल-ताशांच्या तालातून निर्माण होणारा जोश, आवाजाचा थरार आणि पारंपरिक संस्कृतीचा सुरेख संगम साधण्यासाठी वादक तासनतास घाम गाळत आहेत.

यंदाच्या गणेशोत्सवात ढोल-ताशा पथकांसोबतच ध्वज पथक आणि लेझीम पथकांचेही विशेष आकर्षण राहणार आहे. मिरवणुकीत उत्कृष्ट सादरीकरण करण्यासाठी प्रत्येक पथकाकडून ताल, लय आणि शिस्त यावर विशेष भर दिला जात आहे. सरावाच्या ठिकाणी वादन पाहण्यासाठी नागरिकांचीही मोठी गर्दी होत असून, ढोल-ताशांचा निनाद ऐकून



परिसरातील वातावरण आतापासूनच गणेशमय झाले आहे.

नोकरी आणि शिक्षणाची जबाबदारी सांभाळत ही तरुणाई आपल्या संस्कृतीचे जतन करण्यासाठी सरावाला वेळ देत आहे. विविध पथकांमध्ये महिला वादक तसेच ध्वजधारकांचाही सहभाग लक्षणीय वाढला आहे. त्यामुळे यंदाच्या गणेशोत्सवात महिला आणि तरुणाईच्या सहभागाचे विशेष चित्र पाहायला मिळणार आहे.

दरम्यान, ढोल-ताशा पथकांचा थरारक सराव पाहण्यासाठी शहरातील नागरिकही मोठ्या संख्येने मैदानांवर गर्दी करत आहेत. ढोल-ताशांचा कडकडाट, लेझीमचा ताल आणि ध्वज पथकांची रंगत यामुळे गणेशोत्सवापूर्वीच पिंपरी-चिंचवड शहर उत्साहाने भारावून गेले आहे.

# पिंपळवंडी गाव सलग दुसऱ्या दिवशी बंद ; आठवडे बाजारही बंद!

## आठवडे बाजारही बंद; मूक मोर्चा आणि कँडल मार्च काढून आरोपीला कठोर शिक्षेची मागणी!

**» पुणे | प्रतिनिधी**

**पिंपळवंडी (ता. जुन्नर) येथे साडेनऊ वर्षांच्या चिमुकलीवर लैंगिक अत्याचार करून तिची हत्या केल्याच्या संतापजनक घटनेच्या निषेधार्थ ग्रामस्थांनी गुरुवारी (दि. २०) सलग दुसऱ्या दिवशी कडकडीत बंद पाळला. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात संताप आणि शोकाचे वातावरण असून, आरोपीला कठोरात कठोर शिक्षा देण्याची मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. गुरुवारी गावातील आठवडे बाजारही बंद ठेवण्यात आला.**



मंगळवारी (दि. १८) पिंपळवंडी गावठाणात राहणाऱ्या अल्पवयीन मुलीवर २५ वर्षीय तरुणाने लैंगिक अत्याचार करून तिची हत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली होती. घटनेची माहिती मिळताच आळेफाटा पोलिसांनी संशयित आरोपीला तातडीने अटक केली. जिल्हा पोलिस अधीक्षक संदीपसिंह गिल्ल यांनी रात्रीच घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली आणि तपासाला वेग दिला.

या घटनेच्या निषेधार्थ बुधवारी (दि. १९) सकाळपासून ग्रामस्थांनी पिंपळवंडी गाव बंद ठेवले. तसेच पुणे-नाशिक महामार्गावर पिंपळवंडी येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. 'चिमुकलीला न्याय मिळालाच पाहिजे', 'आरोपीला फाशी झालीच पाहिजे', अशा घोषणा देत ग्रामस्थांनी तीव्र संताप व्यक्त केला. मोठ्या संख्येने नागरिक आंदोलनात सहभागी झाले होते.

चिमुकलीच्या कुटुंबीयांचे शासनाने योग्य पुनर्वसन करावे, तसेच कुटुंबाला आवश्यक ती मदत द्यावी, अशी मागणीही ग्रामस्थांकडून करण्यात आली. प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करण्याचे आश्वासन दिल्यानंतर रास्ता रोको आंदोलन मागे घेण्यात आले. त्याच दिवशी सायंकाळी शोकाकुल वातावरणात मोठ्या जनसमुदायाच्या उपस्थितीत चिमुकलीवर अंत्यसंस्कार करण्यात आले.

दरम्यान, या प्रकरणाचा तपास जलदगतीने आणि निष्पक्षपणे करण्यात यावा, तसेच आरोपीवर कायद्यानुसार कठोरात कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून सातत्याने केली जात आहे. घटनेमुळे गावासह परिसरातील नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणात अस्वस्थता आणि संतापाचे वातावरण आहे.

गुरुवारीही ग्रामस्थांनी पिंपळवंडी गाव बंद ठेवून घटनेचा निषेध नोंदविला. गावातील नियमित आठवडे बाजारही बंद ठेवण्यात आला. सायंकाळी ग्रामस्थांच्या वतीने मूक मोर्चा आणि कँडल मार्च काढण्यात येणार असून, त्यानंतर शोकसभेचे आयोजन करण्यात आले आहे. या माध्यमातून चिमुकलीला श्रद्धांजली अर्पण करून तिच्या कुटुंबीयांना न्याय मिळवून देण्याची मागणी करण्यात येणार आहे.

# खाद्यतेल दरवाढीचा स्वयंपाकघराला चटका; लिटरमागे २० ते २५ रुपयांनी वाढ!

**» पुणे | प्रतिनिधी**

**मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण (SIR) मोहिमेमुळे पुणे शहरातील आठ विधानसभा मतदारसंघांमध्ये मोठी मतदार कपात होण्याची शक्यता आहे. सध्या असलेल्या ३४ लाख ६५ हजार ३०५ मतदारांपैकी अनुपस्थित, स्थलांतरित, मृत आणि दुबार मतदारांची नावे वगळल्यानंतर संभाव्य मतदारसंख्या १९ लाख ८० हजार २४२ इतकी राहणार आहे. म्हणजेच तब्बल १४ लाख ८५ हजार, सुमारे ४२ टक्के मतदारांची नावे वगळली जाण्याची शक्यता आहे.**

अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) 'सेफ फूड, सेफ महाराष्ट्र' मोहिमेंतर्गत खाद्यतेल विक्रेते आणि उत्पादकांविरोधातील तपासणी व कारवाईची मोहीम तीव्र केली आहे. अन्नसुरक्षा नियमांनुसार खाद्यतेलाची विक्री निर्धारित निकषांनुसार आणि सुरक्षित पद्धतीने होणे आवश्यक आहे. ग्राहकांना भेसळमुक्त, स्वच्छ आणि सुरक्षित खाद्यतेल मिळावे, या उद्देशाने सुट्या खाद्यतेलाच्या विक्रीवरील निर्बंधांची कडक अंमलबजावणी करण्यात येत आहे.

यापूर्वी अनेक ठिकाणी सुटे खाद्यतेल विकले जात असल्याने ग्राहकांना आपल्या गरजेनुसार कमी किंवा जास्त प्रमाणात तेल खरेदी करता येत होते. या पद्धतीत बाटली, पिशवी, लेबलिंग आणि पॅकिंगचा अतिरिक्त खर्च तुलनेने कमी असल्याने ग्राहकांना तेल कमी किमतीत उपलब्ध होत होते. मात्र, आता तेल पॅकबंद स्वरूपात विकावे लागत असल्याने उत्पादनाच्या अंतिम किमतीत पॅकिंगशी संबंधित विविध खर्चांचा समावेश होत आहे.

प्लास्टिक पिशवी किंवा बाटली, लेबल, पॅकिंग प्रक्रिया, वाहतूक आणि इतर व्यवस्थापन खर्चामुळे तेलाच्या विक्री किमतीत वाढ झाली आहे. श्री रामकृष्ण ऑईल मिल्सचे आनंद पटेल यांच्या माहितीनुसार, विविध खाद्यतेलांच्या किरकोळ दरात लिटरमागे २० ते २५ रुपयांची वाढ झाली आहे. त्यामुळे नियमितपणे खाद्यतेल खरेदी करणाऱ्या ग्राहकांच्या मासिक किराणा खर्चातही लक्षणीय वाढ होण्याची शक्यता आहे.

शहरातील कष्टकरी, रोजंदारीवर काम करणारे तसेच अल्प उत्पन्न असलेले अनेक कुटुंबे आपल्या आर्थिक परिस्थितीनुसार ५० किंवा १०० मिलिलिटर सुटे तेल खरेदी करतात. घरातील रोजच्या गरजेनुसार कमी प्रमाणात तेल घेऊन खर्च भागविणाऱ्या ग्राहकांची संख्या मोठी आहे. मात्र, सुट्या तेलाच्या विक्रीवरील निर्बंधांमुळे आता अशा ग्राहकांना पॅकबंद तेल खरेदी करावे लागणार आहे.

कमी प्रमाणात तेल खरेदी करण्याची सवय असलेल्या ग्राहकांसाठी ही बाब आर्थिकदृष्ट्या अडचणीची ठरू शकते. पॅकबंद तेल खरेदी करताना एकाच वेळी तुलनेने अधिक रक्कम मोजावी लागणार असल्याने त्यांच्या दैनंदिन खर्चाचे गणित बिघडण्याची शक्यता आहे. महिन्याच्या सुरुवातीलाच किराणा सामानासाठी मोठी रक्कम खर्च करावी लागल्याने अल्प उत्पन्न असलेल्या कुटुंबांवर अतिरिक्त आर्थिक ताण निर्माण होऊ शकतो.

सुट्या तेलाच्या विक्रीवरील निर्बंधांमागे ग्राहकांच्या आरोग्याच्या दृष्टीने सुरक्षित आणि दर्जेदार खाद्यतेल उपलब्ध करून देण्याचा उद्देश आहे. पॅकबंद तेलामुळे उत्पादनाची माहिती, वजन, लेबलिंग आणि इतर आवश्यक तपशील ग्राहकांना उपलब्ध होतात. त्यामुळे खाद्यतेलाच्या गुणवत्तेबाबत पारदर्शकता वाढण्यास मदत होऊ शकते.

मात्र, सुरक्षिततेच्या या प्रक्रियेमुळे वाढलेला पॅकिंग खर्च अखेर ग्राहकांनाच सोसावा लागत असल्याचे चित्र आहे. आधीच डाळी, तांदूळ, मसाले, भाज्या आणि इतर जीवनावश्यक वस्तूंच्या वाढत्या किमतीमुळे घरगुती बजेटवर दबाव असताना खाद्यतेलाच्या दरवाढीने त्यात आणखी भर पडली आहे.

खाद्यतेल हा प्रत्येक कुटुंबाच्या स्वयंपाकघरातील अत्यावश्यक घटक आहे. भाजी, पोळी, भजी, तळलेले पदार्थ तसेच दैनंदिन स्वयंपाकासाठी तेलाचा नियमित वापर होतो. त्यामुळे तेलाच्या दरात लिटरमागे २० ते २५ रुपयांची वाढ झाली तर महिन्याच्या एकूण खर्चात त्याचा थेट परिणाम जाणवतो. मोठ्या कुटुंबांमध्ये तेलाचा वापर असल्याने त्यांच्यावर हा अतिरिक्त खर्च जास्त पडणार आहे.



# कचरा प्रक्रिया प्रकल्पांवर ‘स्मार्ट’ मीटर; मोबाईलवरून लक्ष!

## २८ कचरा प्रक्रिया प्रकल्पांवर बसवणार स्मार्ट मीटर; वीजवापराचे तासागणिक रीडिंग ऑनलाइन

**» पुणे | प्रतिनिधी**

**शहरातील कचरा प्रक्रिया प्रकल्पांच्या कामकाजावर आता महापालिका प्रशासनाचे अधिक बारकाईने लक्ष राहणार आहे. प्रत्यक्षात किती कचऱ्यावर प्रक्रिया केली जाते आणि त्यासाठी किती वीज वापरली जाते, याची माहिती मिळवण्यासाठी शहरातील २८ कचरा प्रक्रिया प्रकल्पांवर ‘स्मार्ट’ वीज मीटर बसविण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. या स्मार्ट मीटरमुळे वीजवापराचे तासागणिक रीडिंग ऑनलाइन उपलब्ध होणार असून, प्रशासनाला प्रकल्पांच्या कार्यक्षमतेवर थेट लक्ष ठेवता येणार आहे.**



### स्मार्ट मीटरचा फायदा काय?

- वीजवापराची तासागणिक माहिती ऑनलाइन मिळणार
- प्रकल्प सुरू आहे की बंद, यावर लक्ष ठेवता येणार
- कचरा प्रक्रिया क्षमतेचे ऑडिट करणे शक्य होणार
- मोबाईलवरून अधिकाऱ्यांना थेट मॉनिटरिंग करता येणार
- प्रकल्पांच्या कार्यक्षमतेवर नियंत्रण ठेवण्यास मदत होणार

स्मार्ट मीटर बसविण्यासाठी महापालिका प्रशासनाने गुरुवारी निविदा प्रसिद्ध केली आहे. या यंत्रणेमुळे घनकचरा विभागातील अधिकारी कार्यालयातील संगणकावरून तसेच मोबाईल ॲपच्या माध्यमातून विविध कचरा प्रक्रिया प्रकल्पांचे नियमित मॉनिटरिंग करू शकणार आहेत. त्यामुळे प्रकल्प सुरू आहे की बंद, त्याची कार्यक्षमता किती आहे आणि वीजेचा वापर अपेक्षित पद्धतीने होत आहे का, याची माहिती प्रशासनाला सहज मिळणार आहे.

पुणे शहरात दररोज सुमारे २ हजार ८०० टन कचरा निर्माण होतो. या कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी महापालिकेने शहरात २८ छोटे-मोठे कचरा प्रक्रिया प्रकल्प उभारले आहेत. या प्रकल्पांमध्ये ओला आणि सुका कचरा, झाडांच्या फांद्या, पालापाचोळा, शहाळी, थर्माकोल आदी विविध प्रकारच्या कचऱ्यावर प्रक्रिया केली जाते.

कचऱ्यावर प्रक्रिया केल्यानंतर त्यातून खत, जळाऊ इंधन, सीएनजी तसेच काही प्रकल्पांमध्ये वीजनिर्मिती केली जाते. त्यामुळे हे प्रकल्प नियमित आणि अपेक्षित क्षमतेने सुरू राहणे महापालिकेच्या कचरा व्यवस्थापनाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे.

सध्या या कचरा प्रक्रिया प्रकल्पांवर राज्य वीज मंडळाचे नियमित मीटर आहेत. संबंधित ठेकेदारांसोबत झालेल्या करारानुसार काही प्रकल्पांचे वीजबिल ठेकेदारांकडून, तर काही प्रकल्पांचे वीजबिल महापालिकेकडून भरले जाते. मात्र, काही वेळा प्रकल्प अपेक्षित क्षमतेने सुरू नसल्यास वीजपुरवठा खंडित होणे किंवा यंत्रणेत तांत्रिक बिघाड झाल्याचे कारण दिले जाते.

या पार्श्वभूमीवर प्रत्येक प्रकल्पाच्या वीज वापराची स्वतंत्र आणि अचूक नोंद ठेवण्यासाठी स्मार्ट मीटर बसविण्यात येणार आहेत. या मीटरमुळे प्रत्येक तासाला किती वीज वापरली गेली, याची माहिती प्रशासनाला ऑनलाइन मिळणार आहे. त्यामुळे प्रकल्पाच्या प्रत्यक्ष कामकाजाची आणि वीज वापराची तुलना करणेही शक्य होणार आहे.

स्मार्ट मीटरच्या माध्यमातून केवळ वीज वापरावरच नव्हे, तर कचरा प्रक्रिया प्रकल्पांच्या एकूण कामकाजावर नियंत्रण ठेवण्यास मदत होणार आहे. एखाद्या प्रकल्पात किती कचरा दाखल झाला, त्यापैकी किती कचऱ्यावर प्रक्रिया करण्यात आली आणि प्रकल्प बंद असल्यास किंवा वीजपुरवठा खंडित झाल्यास उर्वरित कचरा कोणत्या अन्य प्रकल्पाकडे वळविण्यात आला, यावरही प्रशासनाला लक्ष ठेवता येणार आहे.

स्मार्ट मीटरवरील रीडिंग ॲपच्या माध्यमातून घनकचरा विभागातील अधिकाऱ्यांना संगणक आणि मोबाईलवर सहज पाहता येणार आहे. त्यामुळे प्रकल्पांच्या कामकाजाचे नियमित ऑडिट करणे, वीज वापराचे विश्लेषण करणे आणि प्रत्यक्ष कार्यक्षमतेवर नियंत्रण ठेवणे प्रशासनाला अधिक सोपे होणार आहे. या यंत्रणेमुळे कचरा प्रक्रिया प्रकल्पांमधील पारदर्शकता आणि कार्यक्षमतेत वाढ होण्याची अपेक्षा आहे.

# ‘इंटेरिअर डिझायनिंग’च्या नावाखाली ७० विद्यार्थ्यांची लाखोंची फसवणूक!

**» पुणे | प्रतिनिधी**

**इंटेरिअर डिझायनिंगच्या शिक्षणासाठी प्रवेश घेतलेल्या तब्बल ७० विद्यार्थ्यांची लाखो रुपयांची फसवणूक झाल्याचा धक्कादायक प्रकार पुण्यात समोर आला आहे. कलिंगा युनिव्हर्सिटीशी संलग्न असल्याचे तसेच फ्लोरिट कॉलेज ऑफ डिझायनिंगची फ्रेंचाइजी असल्याचे भासवून विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आल्याचा आरोप आहे. बनावट कागदपत्रांच्या आधारे ही फसवणूक केल्याप्रकरणी विश्रामबाग पोलिसांनी कॉलेजच्या संचालकासह दोघांना अटक केली आहे.**




प्रथमेश अशोक राऊत (वय २६, रा. पुनावळे) आणि सचिन भीमराव बोराटे (वय ४२, रा. डोंबिवली) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. प्रथमेश राऊत हा पुण्यातील संस्थेचा संचालक असून, सचिन बोराटे हा फ्लोरिट कॉलेज ऑफ डिझायनिंग या संस्थेचा संचालक असल्याचे पोलिसांनी सांगितले. याप्रकरणी त्यांच्या व्यवस्थापनातील इतर साथीदारांविरुद्धही गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महावीर अशोकचंद दुग्गड (वय ४५, रा. छत्रपती संभाजीनगर) यांनी याबाबत विश्रामबाग पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादींच्या मुलीला बारावीनंतर इंटेरिअर डिझायनिंगचे शिक्षण घ्यायचे होते. इंटरनेटवर शोध घेत असताना त्यांना फ्लोरिट कॉलेज ऑफ डिझायनिंगची माहिती मिळाली. त्यानंतर कॉलेजकडून पुण्यात येऊन भेटण्यास सांगण्यात आले. पुण्यात आल्यानंतर त्यांनी प्रथमेश राऊत याची भेट घेतली. राऊत याने आपण फ्लोरिट कॉलेज ऑफ डिझायनिंगच्या पुणे येथील स्टडी सेंटरचा प्रमुख असल्याचे सांगितले.

यावेळी त्याने कलिंगा युनिव्हर्सिटीशी कॉलेज संलग्न असल्याची काही कागदपत्रेही दाखवली. या कागदपत्रांवर विश्वास ठेवून विद्यार्थिनीने १७ जून २०२६ रोजी कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. प्रवेशावेळी सुरुवातीला १० हजार रुपये शुल्क भरण्यात आले. त्यानंतर २१ जुलै २०२६ रोजी विद्यार्थ्यांचे नियमित वर्ग सुरू झाले.

मात्र, ३ ऑगस्ट रोजी विद्यार्थिनीने पालकांना फोन करून कॉलेज दुसऱ्या विद्यापीठाशी संलग्न करण्यात येणार असल्याची माहिती दिली. यामुळे पालकांनी कॉलेजच्या संचालकांशी संपर्क साधला. मात्र, सुरुवातीला त्यांच्याकडून समाधानकारक उत्तरे मिळाली नाहीत. त्यानंतर संबंधित पालकांनी विद्यार्थ्यांच्या वर्गातील इतर पालकांशी संपर्क साधला.

सर्व पालकांनी एकत्रितपणे कॉलेजमध्ये जाऊन चौकशी केली असता, संस्थेचा आणि फ्लोरिट कॉलेज ऑफ डिझायनिंग यांच्यात वाद झाल्याची माहिती समोर आली. तसेच पुण्यातील संलग्नता रद्द करण्यात आल्याचे पालकांना सांगण्यात आले. त्यामुळे पालकांनी भरलेली संपूर्ण फी, विद्यार्थ्यांची मूळ कागदपत्रे तसेच ट्रान्सफर सर्टिफिकेट परत देण्याची मागणी केली.

मात्र, प्रथमेश राऊत याने पैसे आणि कागदपत्रे परत देण्यास तसेच ट्रान्सफर सर्टिफिकेट देण्यास नकार दिल्याचा आरोप आहे. त्यामुळे संतप्त झालेल्या सुमारे ७० विद्यार्थ्यांच्या पालकांनी थेट पोलिसांकडे धाव घेतली.

यानंतर पोलिसांनी कॉलेजमध्ये जाऊन विद्यार्थ्यांचे पैसे परत करण्यास तसेच पालकांच्या मागणीनुसार ट्रान्सफर सर्टिफिकेट देण्यास सांगितले. मात्र, त्यालाही नकार देण्यात आल्याने विश्रामबाग पोलिसांनी गुन्हा दाखल करून प्रथमेश राऊत आणि सचिन बोराटे या दोघांना अटक केली.

या प्रकरणात विद्यार्थ्यांकडून घेण्यात आलेली फी, मूळ कागदपत्रे, कॉलेजची संलग्नता आणि सादर करण्यात आलेली कागदपत्रे याबाबत पोलिसांकडून अधिक तपास सुरू आहे. पोलिस उपनिरीक्षक सत्यवान गेंड या प्रकरणाचा पुढील तपास करीत आहेत.